<table>
<tr><td rowspan="5">MHJN080010292022</td><td>दाखल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">१९/०९/२०२२</td></tr>
<tr><td>नोंदणी दिनांक</td><td>:</td><td colspan="3">१९/०९/२०२२</td></tr>
<tr><td>निकाल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">०७/०५/२०२६</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td rowspan="2">:</td><td>वर्षे</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>०३</td><td>०७</td><td>१८</td></tr>
</table>

## भाग – अ
## Form No. XXXII
## (Title Page of the Judgment)
## (Para 44 (I) of Chapter VI of Criminal Manual)
## घनसावंगी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्या.क्र.२, घनसावंगी यांचे न्यायालयात.
## (पिठासीन अधिकारी : श्रीमती एल. एन. पांचाळ)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२२३/२०२२** **अपराध क्र.७५/२०२२**
**निशाणी : ३८**

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष**...** | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>घनसावंगी पोलीस स्टेशन, घनसावंगी. |
| अभियोगपक्षातर्फे | श्री ए. एम. मोकळे, सहायक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी**...** | सिताराम सखाराम आर्दड,<br>वय : २६ वर्षे, धंदा : शेती,<br>रा.राजाटाकळी, ता.घनसावंगी, जि.जालना. |
| आरोपींतर्फे**...** | श्री. एस. आर. घायतिडक, विद्वान विधीज्ञ |

## भाग - ब
## (Para 44 (ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याचा दिनांक | ०८.०३.२०२२ |
| २ | प्रथम खबर अहवाल दिनांक | १२.०३.२०२२ |
| ३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | १९.०९.२०२२ |
| ४ | गुन्ह्याचा तपशिल दिनांक | २०.०१.२०२३ |
| ५ | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १८.०९.२०२३ |
| ६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | - |
| ७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | ०७.०५.२०२६ |

| | | |
|---|---|---|
| ८ | निकाल सुनावणीचा दिनांक | ०७.०५.२०२६ |

## आरोपींचा तपशिल

| आरोपींची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिताराम सखाराम आर्दड | ०१.०४.२०२२ | ०१.०४.२०२२ | भारतीय दंड विधान कलम २७९, ३०४-अ, व मोटार वाहन अधिनियमचे कलम १३४ सह १७७ अन्वये | निर्दोष | - | - |

## भाग - क

## (Para 44 (iii) of Chapter VI of Criminal Manual)

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदार यादी

### अ. अभियोग पक्ष :-

| अनु क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | संभाजी नागोराव भोसले | १० | फिर्यादी |
| २ | सुदर्शन भगवानराव तौर | | पंच |
| ३ | अहिलाजी गुनाजी शिरगिरे | २६ | फिर्यादी |
| ४ | बबीता अहिलाजी शिरगिरे | २९ | साक्षीदार |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदार जर असतील तर :-

| अनु क्रं. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

### क. न्यायालयीन साक्षीदार असतील तर :-

| अनु क्रं. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

## न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी

### ड. अभियोग पक्ष :-

| अनु क्रं. | कागदपत्रे | निशाणी क्रं. |
|---|---|---|
| १ | समेटपत्र | २५ |

| | | |
|---|---|---|
| २ | फिर्यादीतर्फे पुरावा बंद पुरशिस | ३० |
| 3 | आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वये निवेदन | ३१ |

## इ. आरोपीस मान्य असलेली कागदपत्रे :-

| **अनु क्रं.** | **कागदपत्रे** | **निशाणी क्रं.** |
|---|---|---|
| - | - | - |

## उ. भौतिक वस्तु :-

| **अनु क्रं.** | **भौतिक वस्तु क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| - | - | - |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक : ०७/०५/२०२६)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३०४-अ, २७९, ३३७ व मोटार वाहन अधिनियमचे कलम १३४ सहकलम १७७ नुसार खटला चालविण्यात आला.

अभियोग पक्षाचे थोडक्यात असे कथन की **-**

२. फिर्यादी अहिलाजी गुनाजी शिरगिरे यांनी दि.१२.०३.२०२२ रोजी घनसावंगी पोलीस स्टेशन, ता.घनसावंगी जि.जालना येथे फिर्याद दिली की, दि.०८.०३.२०२२ रोजी रात्री १०.०० वाजेच्या सुमारास ते घरी असताना त्यांचे गावातील संभाजी भोसले यांनी त्यांना फोन करून कळविले की, ' तुमचा मुलगा रुद्र यास गावातील सिताराम आर्दड याचे ट्रॅक्टर क्र.एम.एच.२१.बी.क्यु.५६१४ ने शिवनगाव ते उक्कडगाव रस्त्यावर बेलफाटा येथे धडक दिल्याने त्यास मार लागला आहे व त्यास ते, समाधान, तुकाराम असे उपचारकामी दवाखाण्यात घेऊन जात आहेत, तुम्ही लवकर या, असे कळविले. त्यावरू फिर्यादी व त्यांचा भाऊ शिवाजी व नातेवाईक रामेश्वर काळे असे त्यांच्या मागे सरकारी दवाखाना, घनसावंगी येथे गेलो असता तेथे त्यांच्या मुलावर उपचार चालु होते व तो काहीही बोलत नव्हता. तेव्हा १२.०० वाजेच्या

सुमारास डॉक्टरांनी फिर्यादीचा मुलगा रुद्र शिरगिरे मरण पावला आहे.

३. फिर्यादीच्या तक्रारीवर विसंबून घनसावंगी पोलीस स्टेशन, जि.जालना यांनी आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३०४-अ, २७९ व मोटार वाहन अधिनियमचे कलम १३४ सहकलम १७७ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासी अंमलदार यांनी साक्षीदारांचे बयाने नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला, वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व गुन्ह्याचा संपुर्ण तपास पूर्ण करुन आरोपीविरुध्द या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. दोषारोप पत्रासोबत तपासी अमंलदार यांनी मुळ खबर, छापील नमुन्यातील प्रथम खबरी अहवाल, साक्षीदारांचे जबाब अशी कागदपत्रे सादर केली आहेत.

४. प्रस्तुत प्रकरणात आरोपी हजर झाल्यानंतर माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३०४-अ, २७९ व मोटार वाहन अधिनियमचे कलम १३४ सहकलम १७७ अन्वये गुन्ह्याचा तपशिल निशाणी क्र.१० वर नोंदविला. त्यात आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे कथन केले.

५. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन नि.क्र. वर नोंदविण्यात आले. त्यात त्याने खोटी केस असल्याचा बचाव घेतला.

६. अभियोग पक्षाने सादर केलेल्या सर्व पुराव्याचा एकत्रीतपणे विचार करता खालील मुद्दे मी विचारात घेतले व त्यावर मी माझा निष्कर्ष नोंदविला व त्याची कारणे खाली नमुद केलेली आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दि.०८/०३/२०२२ रोजी रात्री १०.०० वाजेच्या सुमारास मौजे शिवणगाव ते उक्कडगाव रस्त्यावर बेलफाटा येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर क्र.एम.एच.२१.बी.क्यु.५६१४ हे मानवी जीवित धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालविले ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हे हयगयीने व बेदरकारपणे चालवुन फिर्यादीचा मुलगा रुद्र यास धडक देऊन त्याच्या मृत्युस कारणीभुत ठरला ? | नाही. |
| ३ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने अपघाताची माहिती जवळच्या पोलीस स्टेशनला दिली नाही व जखमीस वैद्यकीय मदत दिली नाही ? | नाही. |
| ४ | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करिता :-**

७. मुद्दा क्र.१ ते ३ हे एकाच घटनेशी संबंधित आहेत, त्यामुळे मी त्यांचे विश्लेषण एकत्रीतपणे चर्चेने देत आहे.

८. आरोपीवरील आरोप सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने हे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने त्याच्या ताब्यातील मानवी जीवित धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालविले व फिर्यादीच्या मुलास धडक देऊन त्याच्या मृत्युस कारणीभुत ठरले व आरोपीने अपघाताची माहिती जवळच्या पोलीस स्टेशनला दिली नाही व जखमीस वैद्यकीय मदत दिली नाही.

९. संभाजी भोसले (अ.सा.क्र.१) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले.त्यांनी पुराव्यात घटना दि.०८.०३.२०२२ रोजी रात्री १०.०० वाजता घडलेली आहे. त्यावेळेस ते शिवनगाव येथुन राजाटाकळी येथे जात होते. तेथे त्यांना बेलफाटा येथे एक व्यक्ती पडलेला दिसला. त्यांनी त्यास उठविले, त्याने त्यांना त्यांचे आईवडीलांना कळवा, असे म्हणाला. त्यांनी त्यास गाडीत दवाखान्यात नेले. समाधान आर्दड व तुकाराम आर्दउ या दोघांनी त्यास सरकारी दवाखाना, घनसावंगी येथे नेले. तेथे तो मरण पावला. पोलीसांनी त्यांच्याकडे चौकशी केली होती.

१०. त्यांनी उलटतपासात मान्य केले की, गाडीवर मी एकटाच होतो. ट्रॅक्टर

तुकाराम सखाराम आर्दड यांचे होते. घटनेवेळेस ते थांबले तेव्हा त्यांना तुकाराम व सखाराम आर्दड हजर होते. ते घटनास्थळावर त्यांच्या नंतर आले. दवाखान्यात ते सोबत नव्हते. घटना ही घटनास्थळावर पोहचण्याच्या किती वेळापुर्वी घडली होती हे त्यांना सांगता आले नाही. इतर सुचके त्यांनी नाकारली.

११. सुदर्शन तौर (अ.सा.क्र.२) हे घटनास्थळ पंच आहेत. त्यांच्या पुराव्याचे अवलोकन केले. त्यांनी पुराव्यात पोलीसांनी त्यांना बोलविले नसल्याचे असे कथन करून त्यांच्या समक्ष कोणतीही कारवाई झाली नसल्याचे सांगितले. त्यांना घटनास्थळ पंचनामा दाखविला असता त्यातील मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शवून त्यावरील सही देखील त्यांची नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने अभियोग पक्षाकडुन भारतीय पुरावा कायद्याच्या परवानगीने उलटतपासात विचारण्यात येणारे प्रश्न विचारले, परंतू आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द होईल असा कोणताही त्यांच्या पुराव्यातुन आला नाही.

१२. अहिलाजी शिरगीरे (अ.सा.क्र.३) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले. त्यांनी पुराव्यात त्यांचा मुलगा रुद्र याचा ट्रॅक्टरच्या धडकेने मृत्यु झाला होता. तो ट्रॅक्टर कोणाचा होता, हे त्यांना माहीत नाही. तसेच आरोपीचे ट्रॅक्टरने शिवणगाव ते उक्कडगाव रस्त्यावर बेलफाटा येथे धडक दिल्याने मार लागला व उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला, असे काहीही घडले नसल्याचे कथन केले. त्यांना फिर्याद दाखविली असता त्यावरील केवळ त्यांची सही मान्य करून त्यातील मजकुर माहिती नसल्याचे सांगितले. साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने सदर साक्षीदारास अभियोग पक्षाकडुन भारतीय पुरावा कायद्याच्या परवानगीने उलटतपासात विचारण्यात येणारे प्रश्न विचारले, परंतू आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द होईल असा कोणताही त्यांच्या पुराव्यातुन आला नाही. तसेच फिर्यादीने त्यांच्यात व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर समेट झाल्याचे मान्य केले आहे.

१३. बबीता शिरगीरे (अ.सा.क्र.४) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले. त्यांनी पुराव्यात त्यांचा मुलगा रुद्र याचा ट्रॅक्टरच्या धडकेने मृत्यु झाला होता. तो ट्रॅक्टर कोणाचा होता, हे त्यांना माहीत नाही. तसेच आरोपीचे ट्रॅक्टरने शिवणगाव ते उक्कडगाव

रस्त्यावर बेलफाटा येथे धडक दिल्याने मार लागला व उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला, असे काहीही घडले नसल्याचे कथन केले. साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने सदर साक्षीदारास अभियोग पक्षाकडुन भारतीय पुरावा कायद्याच्या परवानगीने उलटतपासात विचारण्यात येणारे प्रश्न विचारले, परंतू आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द होईल असा कोणताही त्यांच्या पुराव्यातुन आला नाही. तसेच फिर्यादीने त्यांच्यात व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर समेट झाल्याचे मान्य केले आहे.

१४. एकंदरीतच न्यायालयीन अभिलेखावरील पुरावा लक्षात आरोपीने त्याच्या ताब्यातील मानवी जीवित धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालविले व फिर्यादीच्या मुलास धडक देऊन त्याच्या मृत्युस कारणीभुत ठरले व आरोपीने अपघाताची माहिती जवळच्या पोलीस स्टेशनला दिली नाही व जखमीस वैद्यकीय मदत दिली नाही, असा दाखविणारा कोणताही पुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणलेला नाही. सा.क्र.१ ने सांगितले की, घटनास्थळी ते हजर होते. परंतू त्यांच्या साक्षीवरून असे दिसून येते की, घटना झाल्यानंतर ते तेथे पोहचले. घटना त्यांनी प्रत्यक्ष पाहिली नाही. घटनास्थळी आरोपी व त्याचे वडील हजर असल्याचे सांगितले. परंतू त्यांनी सरतपासामध्ये हेही सांगितले की, आरोपी व त्याच्या वडीलाने मयत व्यक्तीस दवाखान्यात घेऊन गेले होते. म्हणजेच आरोपीने अपघात केला होता व त्या अपघातामुळेच मयत व्यक्ती मयत झाल्याचे त्याच्या साक्षीमध्ये कूठेही आलेले नाही. याउलट स्वत: फिर्यादीने कोणतीही घटना घडली नसल्याचे सांगितले आहे. एकंदरीत अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरून आरोपीविरूध्द लागलेले दोषारोप संशयापलीकडे जाऊन सिध्द होत नाही. आरोपीविरुध्द नोंदवण्यात आलेला गुन्हा सिध्द करण्याकरिता वाजवी व संशयापलीकडील पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.४ करिता</u> :-**

१५. मुद्दा क्र.१ ते ४ च्या निष्कर्ष प्राप्ती नुसार भारतीय दंड विधान कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनियमचे कलम ३/१८१ व १३०/१७७ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध आरोपीविरुध्द सिध्द झालेला नाही. सबब, सदर

अपराधामधुन आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. जप्त ट्रॅक्टर क्र.एम.एच.२१.बी.क्यु.५६१४ चा अंतरिम ताबा मुळ मालक अविनाश जाधव यांना देण्यात आलेला असून तो कायम करणे न्यायोचित होईल. सबब, मुद्दा क्र.४ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो :-

## आ दे श

(१) आरोपीला भारतीय दंड विधान कलम ३०४-अ, २७९ व मोटार वाहन अधिनियमचे कलम १३४ सहकलम १७७ भारतीय दंड विधान नुसार या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते.

(२) आरोपीचे जामीन व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहे.

(३) जप्त ट्रॅक्टर क्र.एम.एच.२१.बी.क्यु.५६१४ चा अंतरिम ताबा मुळ मालक अविनाश जाधव यांना देण्यात आलेला असून तो कायम करण्यात येतो.

(४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे अपील न्यायालयात हजर राहण्याकरिता रक्कम रुपये १०,०००/- वैयक्तीक बंधपत्र या न्यायालयात सादर केलेला आहे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

स्वाक्षरीत/-
**(श्रीमती एल. एन. पांचाळ)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्या.क्र.०२,
घनसावंगी.

दिनांक : ०७/०५/२०२६.
स्थळ : घनसावंगी.